प्रेसनोट

दि. ०२/०५/२०१८

## सायबर सेल कडून गेनबिटकॉईन या कंपनीच्या मुख्य सूत्रधारासह एकूण १० आरोपी अटक

बिटकॉईन या क्रिप्टो करन्सीवर आधारित गुंतवणुक योजनेत गेन बिटकॉईन कंपनीमध्ये १ बिटकॉईन गुंतवणुकीवर दरमहा ०.१ टक्के बिटकॉईन असे १८ महीन्यात एका बिटकॉईनचे एकुण १.८ बिटकॉईन असा परतावा देण्याचे अमीष दाखवुन अनेक नागरिकांची फसवणुक केली म्हणुन पुणे शहरात **१) दत्तवाडी पो.स्टे गुन्हा रजि. नं. २८/२०१८ भा.द.वि. कलम ४०६,४०९,४२०,१२०ब सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ डी, प्राईस चिट फंड ॲण्ड मनी सर्कुलेशन ॲक्ट( बॅनींग) चे कलम ४, ५ व एमपीआयडी ॲक्ट कलम ३** व **२) निगडी पो. स्टे. पुणे गुन्हा रजि. नं. १८१/२०१८ भा.द.वि. कलम ४०६,४०९,४२०,१२०ब सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ डी, प्राईस चिट फंड ॲण्ड मनी सर्कुलेशन ॲक्ट( बॅनींग) चे कलम ४, ५ व एमपीआयडी ॲक्ट कलम ३** अन्वये असे दोन गुन्हे दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हयाचा तपास सायबर सेलकडील विशेष तपास पथकामार्फत चालु आहे.

मुख्य आरोपी अमित भारद्वाज याच्या भारतामध्ये खालील प्रमाणे कंपन्या असल्याचे निष्पन्न झाले असून १) Nexgen Facility Management Private Limited, 2) Miners India Technologies Private Limited, 3) Norton Sales Private Limited, 4) Radox Infotech Private Limited, 4) Hans Clouding IT LLP, Sabtechs Services (India) Private Ltd., 5) Grand Wedding Solutions Limited या कंपन्या स्थापन केल्या आहेत. तसेच भारताबाहेर अमेज मायनर्स प्रा. लि., हॉगकॉग, एबीसी मेगा अलाईन्ज, दुबई , एबी फासिलिटी मॅनेजमेंट, दुबई या कंपन्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणुक केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

मुख्य आरोपी याने www.gainbitcoin.com गेनबिटकॉईन डॉट कॉम ही वेबसाईट तयार केली असून त्याद्वारे तो यातील फिर्यादी व बळीतांचे त्यावर रजिस्ट्रेशन करुन त्यांचे युजर आयडी वर आभासी बिटकॉईनचा परतावा मिळाला असल्याचे भासवित असे. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात त्याने बिटकॉईन फसवणुक करुन त्याचे कंपनीचे आयडीवर घेतलेले आहेत. सदर वेबसाईट आरोपीने बंद करून फसवणुक केली आहे. सध्या मुख्य आरोपीपैकी ५ आरोपी हे पोलीस कोठडी रिमांडमध्ये असून त्यांचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने कसुन तपास चालू आहे. तसेच यातील पाहिजे आरोपींचे शोधाकरिता सायबर विभागाकडील २ पथके वेगवेगळ्या ठिकाणी रवाना करण्यात आली असून त्यांचेविरूध्द मा. कोर्टाकडून अजामीनपात्र वॉरंट व लुकआऊट नोटीस काढण्यात आली आहे.

सदर गुन्ह्यांमध्ये गेन बिटकॉईन एमएलएम बिटकॉईन गुंतवणुक फ्रॉडचे तपासाकरिता गठीत केलेल्या सायबर सेलकडील विशेष तपास पथकाने गेन बिटकॉईन फ्रॉडमधील गुन्हयाचे तपासात नागरीकांना गेन बिटकॉईन एमएलएममध्ये गुंतवणुक करण्यास उद्युक्त करणाऱ्यांना वर नमुद दोन्ही गुन्ह्यात **आत्तापर्यंत १० आरोपी अटक करण्यात आले असून सदर आरोपींकडून एकूण २३७ बिटकॉईन, ९० इथेरियम व ३८.९३ लाख रूपये डी.डी. स्वरूपात असे एकूण अंदाजे १५ कोटी रूपये हस्तगत करण्यात आले आहेत.**

आत्तापर्यंत सायबर क्राईम सेल येथे एकूण ७३ साक्षीदार/बळीतांची अंदाजे ७ कोटी रूपयांची फसवणुक झाली असल्याचे समोर आले आहे.

याद्वारे नागरिकांना आव्हान करण्यात येते की, गेन बिटकॉईन या कंपनीमार्फत कोणाची फसवणुक झाली असल्यास त्यांनी सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर येथे संपर्क करावा.

संपर्क :-

सायबर सेल फोन नं. ०२०-२६१२३३४६

ईमेल आयडी- crimecyber.pune@nic.in

Scanned by CamScanner